**समाज विकास विभाग**
पुणे महानगरपालिका
जावक क्र. सविवि/ ८९३६
दिनांक ०८/०२/२०१९

# कार्यालयीन परिपत्रक

मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. १०९४ दिनांक २६/३/२०१८ अन्वये राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणे करिता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता व मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रा सोबतच्या जोडलेल्या यादीस मान्यता देणेत आली आहे.

राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या यादीप्रमाणे विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत प्रभाग निहाय मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत राबविणेत यावी. त्याकरीता मा. प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच त्या अनुषंगिक संपूर्ण कार्यवाही संबंधित त्या त्या क्षेत्रिय कार्यालयाचे मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत करणेत यावी. सदर विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम यांचे अहवाल संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे परिमंडळ उप आयुक्त यांचे मार्फत मा. महिला बाल कल्याण समिती समोर सादर करणेत यावेत व त्याची एक प्रत या कार्यालयाकडे पाठवावी. सदर योजनेसाठीची उपलब्ध तरतूद क्षेत्रिय कार्यालय निहाय प्रत्येक प्रभागास रक्कम रू. ६ लाख या प्रमाणे खर्च करणे आहे.

सदर विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम व तद्नुषंगिक होणाऱ्या खर्चाकरीता समाज विकास विभागामार्फत ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत FE14C209 (राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना) या अर्थशिर्षकावर लॉकींग करून देणेत येईल.

कळावे.

**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अवलोकनार्थ व माहितीसाठी –**

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अति. महापालिका आयुक्त (ज./इ./वि.), पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अंमलबजावणीसाठी –**

१) मा. सह महापालिका आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. १, २, ४)
२) उप आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. ५, ३)
२) मा. महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय १ ते १५)

FE14C209 (राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना) या अर्थशिर्षका अंतर्गत करावयाची कार्यवाही/कामे

| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| १) | **शिक्षण, प्रशिक्षण व क्षमता बांधणी आणि जनजागृती.** |
| अ) | **व्याख्यानमाला.**<br>• पुणे शहरातील विविध क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तज्ञ, अनुभवी व नामांकित महिलांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.<br>• पुणे शहरातील उच्च शिक्षित, शिक्षित व अशिक्षित, गरीब, गरजू, दुर्बल घटकातील महिलांना प्रोत्साहन देण्याकरीता व्याख्याने व कार्यशाळेचे आयोजन करणे.<br>• पुणे महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या इ. ८ वी ते इ. १० वी व माध्यमिक शाळेतील व महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीसाठी व्याख्यानेमालेचे आयोजन करणे. किशोरवयीन मुला मुलींमध्ये मानसिक,शारिरिक बद्लांबाबत माहिती देणे.<br>• पुणे शहरात अभियांत्रिकी, आरोग्य, पर्यावरण, संगणक शिक्षण, शिक्षण, सामाजिक शिक्षण, व्यवसाय संबंधित शिक्षण या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या महिलांकरीता विशेष व्याख्यानांचे आयोजन करणे.<br>• ज्येष्ठ महिला यांच्याकरीता दैनंदिन आरोग्य, आहार, विहार व कायदयांबाबत विशेष तज्ञांचे मार्गदर्शन.<br>• पुणे शहरातील महिलांकरीता मुलांचे संगोपन, संस्कार, सामाजिक संरक्षण, महिलांचे कार्य व जबाबदाऱ्या, कौटुंबिक हिंशाचार , नवीन तंत्रज्ञानाची ओळख, युवती, स्त्रिया व चाळीशी नंतरच्या स्त्रिया यांचे आरोग्य विषयक मार्गदर्शन. |

| अ. क्र. | पात्रता | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उच्च शिक्षीत, शिक्षीत | सर्व क्षेत्रात कार्यरत महिला वर्ग | | | यशदा/बार्टी/ पुणे विद्यापीठ | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ खुल्याजागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा इ. |
| २ | अशिक्षीत,गरीब,गरजु ,दुर्बल घटकातील महिलांना | बचत गट, कचरावेचक संघटना, स्वच्छता कामगार महिला, मानधन तत्वावरील महिला, शेजार समूह गट स्वयंसेविका इ. | | | यशदा/बार्टी/ पुणे विद्यापीठ | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ खुल्याजागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा इ. |
| ३ | १३ ते १९वयोगटातील विद्यार्थीनींसाठी | सर्व शाळांमधील / महाविद्यालयीन विद्यार्थीनींसाठी | | | यशदा/बार्टी/ पुणे विद्यापीठ | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा इ. |
| ४ | ६० वर्षे वयोगटावरील सर्व महिला | जेष्ठ महिलांसाठी | ४ | प्रति कार्यक्रम २५०००X ४ = १०००००/- | यशदा/बार्टी/ पुणे विद्यापीठ | सभागृह उपलबधते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्तीसमाज मंदिर/ मनपा शाळा इ. |
| ५ | १५ - ६० वर्षे वयोगटावरील महिला | युवती,स्त्रिया,जेष्ठ महिला | | | यशदा/बार्टी/पुणे विद्यापीठ | सभागृह उपलबधते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा इ. |

| ब. | विविध क्षेत्रातील महिलांसाठी आरोग्य विषयक उपक्रम राबविणे. |
|---|---|

- वैद्यकीय क्षेत्रातील इंडियन मेडिकल असोसिएशन लायन्स क्लब, रोटरी क्लब यांच्याकडून महिलांच्या आरोग्य विषयक शिबीरे .
- पुणे महानगरपालिकेतील बचत गट, कचरावेचक संघटना, स्वच्छता कामगार महिला, मानधन तत्वावरील महिला, शेजार समूह गट स्वयंसेविका महिला व मुली इ. साठी त्यांचे मागणी नुसार संपूर्ण आरोग्य तपासणी शिबीर.
- पुणे शहरामध्ये शासकीय व खाजगी आस्थापनावर अधिकारी, कर्मचारी यांच्या करीता मार्गदर्शन शिबीरे आयोजित करणे.

| अ. क्र. | तपशिल | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | महिलांसाठी आरोग्य विषयक मार्गदर्शन (स्तन कर्करोग, लोह कमतरता, सर्व्हायकल कॅन्सर व ईतर ) | सर्व महिलांसाठी (युवती, स्त्रीया, जेष्ठ महिला) | ४ | २५०००X४= १०००००/- | यशदा/बार्टी/ पुणे विद्यापीठ, लायन्स क्लब, रोटरी क्लब | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा/मनपा दवाखाना इ. |
| २ | महिलांसाठी आरोग्य तपासणी (स्तन कर्करोग व सर्व्हायकल कॅन्सर) | सर्व महिलांसाठी (युवती, स्त्रीया, जेष्ठ महिला) | ४ | २५०००X४= १०००००/- | पुणे मनपा यांचे हॉस्पीटल व यांचेकडील नांदेणीकृत शहरातील खाजगी हॉस्पीटल / आयएमए , लायन्स क्लब, रोटरी क्लब | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा/मनपा दवाखाना इ. |
| | | | | | | |

| क. | कौशल्य विकास अंतर्गत विविध विषयाचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे |
|---|---|

| अ. क्र. | पात्रता | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | महिलांसाठी कौशल्य विकास अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम,. | इ. १५ ते ३५ वयोगटातील मुली/स्त्रीया ( प्रशिक्षण) | ५ | १००००X५= ५००००/- | यशदा/बार्टी/ पुणे विद्यापीठ, मिटकॉन | सभागृह उपलबधते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा इ. |
| २ | छोटे व्यवसाय करणेबाबत मार्गदर्शन, व्यवसाय वृध्दी, विक्री प्रशिक्षण | ३ दिवस प्रशिक्षण | | | यशदा/बार्टी/ पुणे विद्यापीठ, मिटकॉन | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा इ. |
| | | | | | | |

| ड. | **महिला, मुली व ज्येष्ठ नागरीक महिलांकरीता सामाजिक सुरक्षितता याबाबत प्रकल्प राबविणे.** – मनपा सुरक्षा विभाग व पोलीस यांच्या सहकार्याने पुणे शहरातील प्रत्येक प्रभागाशी संबंधित पोलीस स्टेशन पातळीवरती पथक तयार करणे. |
|---|---|

| अ. क्र. | पात्रता | प्रशिक्षणार्थी | कार्यक्रम संख्या | रक्कम रुपये | राबविणारा विभाग/खाते | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मुली, महिला व जेष्ठ महिला | मुली, महिला व जेष्ठ महिला | ३ (तीन दिवसीय) | ५०००० x ३= १५००००/- | पुणे मनपा व पोलीस विभाग | सभागृह उपलब्धते नुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा/मनपा उद्याने इ. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ड | **बेटी बचाओ बेटी पढाओ अंतर्गत विविध कार्यक्रम –** मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, त्यांना शिक्षण देणे व बाल विवाहास प्रतिबंध करणे या उद्देशाने विविध कार्यक्रम पथनाट्यद्वारे, व्याख्यानांद्वारे जाणीव जागृती करणे. | | | | | |
| १. | मुली, महिला व जेष्ठ महिला | मुली, महिला व जेष्ठ महिला | २० | ५०००x२०= १०००००/- | पुणे महागनरपालिका पुरस्कृत बचत गट, महिला मंडळे | सभागृह उपलब्धतेनुसार पुणे मनपा/ खुल्या जागा/ वस्ती समाज मंदिर/ मनपा शाळा/मनपा उद्याने इ. |

(संजय रांजणे) 30.12.18
मुख्य समाज विकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र. सविवि/२७८० २७८९
दिनांक १५/११/२०१८

मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर.

**विषय :– राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणे करिता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

संदर्भ :– मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. १०९४ दिनांक २६/३/२०१८ (नि - ०८)

मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. १०९४ दिनांक २६/३/२०१८ अन्वये राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणे करिता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता व मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रा सोबतच्या जोडलेल्या यादीस मान्यता देणेत आली आहे.

१. राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या यादीप्रमाणे विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणेस. तसेच योजना/कार्यक्रम/उपक्रमांची अंमलबजावणी करणेकरीता मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची मान्यता घेणेस.
२. राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या यादीप्रमाणे विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत प्रभाग निहाय मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत राबविणेस. त्याकरीता मा. प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच त्या अनुषंगिक संपूर्ण कार्यवाही संबंधित त्या त्या क्षेत्रिय कार्यालयाचे मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत करणेस. सदर विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम यांचे अहवाल संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत मा. महिला बाल कल्याण समिती समोर सादर करणेस.
३. सदर योजनेसाठीची उपलब्ध तरतूद क्षेत्रिय कार्यालय निहाय प्रत्येक प्रभागास रक्कम रू. ६ लाख या प्रमाणे खर्च करणेस.
४. समाज विकास विभागामार्फत सदर योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणेकरीता आवश्यक रक्कम लॉकींग करून देणेस.

...२//

५. मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या तक्यातील योजना/कार्यक्रम/उपक्रमांची अंमलबजावणी करताना आवश्यक तेथे तज्ञ व्यक्तींची/संस्थांची नेमणूक करणेस, त्यांचे मानधन देणेस, आवश्यक साहित्य खरेदी करणेस व तदनुषंगिक खर्च यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात उपलब्ध झालेल्या अर्थशिर्षक व तरतूदीमधून खर्च करणेस.

६. सदर विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम व तदनुषंगिक होणारा खर्च ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत FE14C209 (राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना) या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

७. सन २०१८–२०१९ मध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करणेस. सन २०१९–२०२० पासून तरतूद उपलब्ध झाल्यास सदर योजनेची अंमलबजावणी करणेस.

८. मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यातील योजना/कार्यक्रम/उपक्रम अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय घेण्याचे, योजनांचे नियम अटीमध्ये कालानुरूप बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस.

९. महिलांसाठी आल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण – एल. ई. डी. लाईट तयार करणे तसेच महिलांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण देणे या योजनांचा समावेश करावा तसेच डॉकेटमधील तक्त्यातील क्र. ६ राबविणारा विभाग/खाते यामध्ये स्वयंसेवी संस्थांचाही समावेश करणेस.

तरी वरील अ. क्र. १ ते ९ प्रमाणे ठरावाची अंमलबजावणी करणेस व त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या सर्व संबंधितांना मुख्य समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांचे स्वाक्षरीने सोबतचे कार्यालयीन परिपत्रकाद्वारे कळविणेकरीता आपली प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती आहे.

मा. स. कळावे.

(मुकुंदा महाजन)
**उप समाज विकास अधिकारी**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

(रामदास चव्हाण)
**समाज विकास अधिकारी**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि.)**
पुणे महानगरपालिका

~~यांचेमार्फत सविनय सादर.~~

**सोबत** – सदर्भांकित ठराव

D:\NEW_UCD3\Chavan Sir\docket rani laxmibai mahila sakshamikaran yojana babat.doc

**अंतर्गत अर्थान्वीक्षक कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
बिलो नं. २७४२२ दिनांक– २४/१२/२०१८ चे लगत

**मा.महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर...

मा. उप आयुक्त, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका यांनी राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणे करिता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत निवेदनातील संदर्भ क्र. १ नुसार जा.क्र. सविवि/२७४१, दि. १५/११/२०१८ ने निवेदन सादर केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. १०९४ दिनांक २६/३/२०१८ अन्वये राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणे करिता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता व मा. महापालिका आयुक्त यांचे कार्यालयीन जा. क्र. मआ/सविवि/७४८८ दि. ४/१/२०१८ ने विषयपत्रा सोबतच्या जोडलेल्या यादीस मान्यता देणेत आली आहे.

मा. महानगरपालिका सभा ठराव क्र. १०९४ दिनांक २६/३/२०१८ मध्ये **महिलांसाठी अल्पकालिन कौशल्य प्रशिक्षण–एलईडी लाईट तयार करणेस तसेच महिलांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण देणे या योजनांचा समावेश करावा तसेच डॉकेटमधील तक्त्यातील क्र. ६ राबविणारा विभाग/खाते यामध्ये स्वयंसेवी संस्थांचाही समावेश करण्यात यावा** याचा समावेश नव्याने करण्यात आलेला आहे. त्याबाबत ऑडिट विभागाने खात्याचा सुस्पष्ट अभिप्राय व या बाबीसाठी किती खर्च येणार आहे व सदरचा खर्च कोणत्या अर्थशिर्षकावर खर्च करण्यात येणार आहे याबाबत विचारणा केली असता खात्याने नि ३३ वर खुलासा सादर केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी ऑडिट विभागाने काढलेल्या आक्षेपास खात्याने जा. क्र. ३३१३, दि. २४/१२/२०१८ ने केलेला खुलासा अवलोकन केले असता खात्याचे जा. क्र. सविवि/२७४१, दि. १५/११/२०१८ चे निवेदनातील ‘क्ष’ प्रस्तावातील १ ते ९ प्रमाणे ठरावाची अंमलबजावणी करणेस व त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या सर्व संबंधितांना मुख्य समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांचे स्वाक्षरीने सोबतचे कार्यालयीन परिपत्रकाद्वारे कळविणेकरीता आपली प्रशासकिय मान्यता मिळणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

| | | | |
|---|---|---|---|
| (तोटकर डी.ए.) | (कल्याणकर संजय) | (सुपे ज्ञानदेव) | (सौ. कळसकर) |
| **वरिष्ठ लिपीक** | **अधिक्षक** | **प्रशासन अधिकारी** | **मुख्य लेखा व वित्त अधिकारी** |
| अंतर्गत अर्थान्विक्षक विभाग | अंतर्गत अर्थान्विक्षक विभाग | अंतर्गत अर्थान्विक्षक विभाग | पुणे महानगरपालिका |
| पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | |

**मा. अति. महापालिका आयुक्त (वि)**
पुणे महानगरपालिका

17.12.19

यांचेमार्फत सविनय सादर.

**सोबत–संपूर्ण प्रकरण.**

**राजेंद्र निंबाळकर**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)**
**पुणे महानगरपालिका**

मा. महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
मा. महानगरपालिका आयुक्त
ठराव क्र. ६१७६२
दिनांक २९/१/२०१९

नगरसचिव कार्यालय

पुणे महानगरपालिका

महानगरपालिका सभा ठराव

सभा क्रमांक :- १३४

विषय क्रमांक :- १००३

ठराव क्रमांक :- १०९४

दिनांक :- २६/३/२०१८

खाते – महापालिका आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि /७४८,दि.४/१/२०१८ चे पत्र .
२) मा.सौ.मुक्ता जगताप व मा.सौ.वृषाली कामठे यांची दि. १०/१/२०१८ ची उपसुचना
३) महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.१६५ दि. १०/१/२०१८
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२००३,दि.२३/१/२०१८

------

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस व संदर्भ क्र.२ च्या उपसुचनेनुसार –

राणी लक्ष्मीबाई सक्षमीकरण योजना अंतर्गत विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणे करिता व त्यासाठीचे धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता खालील बाबीस व मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रा सोबतच्या जोडलेल्या यादीस मान्यता देण्यात येत आहे.

१. राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या यादीप्रमाणे विविध योजना/ कार्यक्रम/ उपक्रम राबविणेस. तसेच योजना/कार्यक्रम/उपक्रमांची अंमलबजावणी करणेकरीता मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची मान्यता घेणेस.

२. राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या यादीप्रमाणे विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत प्रभाग निहाय मा.महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत राबविणेस. त्याकरीता मा. प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच त्या अनुषंगिक संपूर्ण कार्यवाही संबंधित त्या त्या क्षेत्रिय कार्यलियाचे मा. महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत करणेस. सदर विविध योजना/ कार्यक्रम/उपक्रम यांचे अहवाल संबंधित क्षेत्रिय कार्यलयाचे मा.महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे मार्फत मा. महिला बाल कल्याण समिती समोर सादर करणेस.

३. सदर योजनेसाठीची उपलब्ध तरतूद क्षेत्रिय कार्यालय निहाय प्रत्येक प्रभागास रक्कम रू. ६ लाख या प्रमाणे खर्च करणेस.

४. समाज विकास विभागामार्फत सदर योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणेकरीता आवश्यक रक्कम लॉकींग करून देणेस.

५. मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रासोबतच्या जोडलेल्या तक्यातील योजना/कार्यक्रम/उपक्रमांची अंमलबजावणी करताना आवश्यक तेथे तज्ञ व्यक्तींची/संस्थांची नेमणूक करणेस, त्यांचे मानधन देणेस, आवश्यक साहित्य खरेदी करणेस व तद्नुषंगिक खर्च यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात उपलब्ध झालेल्या अर्थशिर्षक व तरतूदीमधून खर्च करणेस.

६. सदर विविध योजना/उपक्रम/कार्यक्रम व तद्नुषंगिक होणारा खर्च ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत FE14C209 (राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना) या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.

७. मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रा सोबत जोडलेल्या तक्त्यातील योजना/कार्यक्रम/उपक्रम अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय घेण्याचे, योजनांचे नियम अटीमध्ये कालानुरूप बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना अथवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस

८. महिलांसाठी अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण – एल.ई.डी.लाईट तयार करणे तसेच महिलांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण देणे या योजनांचा समावेश करावा तसेच डॉकेटमधील तक्त्यातील क्र.६ राबविणारा विभाग/ खाते यामध्ये स्वयंसेवी संस्थांचाही समावेश करण्यात यावा .

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

६

मा. ----------
मा. ----------
मा. ---------- मुख्य समाज विकास अधिकारी

यांजकडेस,

कार्यवाहीबाबत मा. अति.महा. आयुक्त (वि) (ज) (इ) यांचे मार्फत मा. महा.आयुक्त यांचे आदेश घ्यावेत ही विनंती.

अधिक्षक

महापालिका आयुक्त कार्यालय

पुणे महानगरपालिका

o/w 10738

31 MAR 2018